Chairman
**Vidyadhar Anaskar**
M.Com., D.T.L., D.L.L. & L.W., LL.B.

Vice Chairman
**Ramakant Khetan**
B.Sc., LL.B.

Chief Executive & Secretary
**Sou. Sayali Bhoir**
B.Com., G.D.C. & A., LL.B., C.A.I.I.B

# The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.

(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March 1979)

Bharatiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai - 400 031. P. B. No. 7120,
Tel. : 022 - 2413 5797, Fax : 022 - 2415 1185
E-mail : admin@mucbf.com ● www.mucbf.com

परिपत्रक: एमयुसीबीएफ/३९/४/२०१७-१८
दिनांक: २७ एप्रिल,२०१७

**प्रति,**
**मा.अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व प्राथमिक नागरी सहकारी बँका व
नागरी सहकारी बँकांची जिल्हा/विभागीय असोसिएशन्स्

विषय: नागरी सहकारी बँकांमधील कामकाजासंदर्भात शोध निबंध सादर करणेबाबत.
संदर्भ: उत्कृष्ट शोध निबंधानंतर सखोल चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात येणारे राज्यस्तरीय चर्चासत्र.

**महोदय / महोदया,**

सध्या देशातील नागरी सहकारी बँकींग क्षेत्राला स्पर्धात्मक वातावरणात मार्गक्रमण करावे लागत आहे. रिझर्व्ह बँकेने लागू केलेल्या आर्थिक सक्षमतेच्या निकषांचे पालन करताना या बँकांना अनेक अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकींग क्षेत्राला संजीवनी देण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ, यशस्वी बँकर्स, चार्टर्ड अकौंटंटस्, कायदेशीर सल्लागार आणि रिझर्व्ह बँक व सहकार खात्यातील निवृत्त अधिकाऱ्यांकडून विविध विषयांवरील शोध निबंध मागविण्यात येत आहेत.

शोध निबंधाच्या विषयांमध्ये नागरी सहकारी बँकींग क्षेत्राशी संबंधित सर्वच विषयांचा समावेश असणार आहे. उदा. व्याजाव्यतिरिक्त इतर उत्पन्न वाढीचे इतर मार्ग, निरनिराळया न्यायालयीन निवाडयांवर आधारित व्यावहारिक मार्गदर्शन, रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक निकषांचे पालन करण्याच्यादृष्टीने बँकेच्या व्यवहारांमधील बदल, सहकार कायद्यातील तरतुदींचा योग्य प्रकारे वापर करुन बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारणे, प्रशिक्षणासाठी ई-मोड्युल्स्चा वापर करणे, वसुलीसंदर्भातील नवीन योजना, कर्जासंबंधी तपासणी अहवालाच्या (Loan Appraisal) नवीन पध्दती, Technology and Innovative Banking इत्यादीं विषयांवर संबंधितांकडून शोध निबंध अपेक्षित आहेत.

नियोजित चर्चासत्रांमधून सर्व शोध निबंधांवर सखोल चर्चा अपेक्षित आहे. यातील निवडक शोध निबंधांना पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल. तसेच उत्कृष्ट ठरणाऱ्या शोध निबंधांचे संकलन करुन एक पुस्तिका देखील छापण्यात येईल.

अशा प्रकारे नेहमीच्या परिसंवादांना छेद देत 'ज्ञानाधिष्ठीत चर्चासत्र' वर्षातून एकदा आयोजित करण्याचा फेडरेशनचा मानस आहे.

सबब नागरी सहकारी बँकींग क्षेत्रातील सर्व संबंधितांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा संपूर्ण सहकारी बँकींग क्षेत्राला होण्यासाठी आपले शोध निबंध फेडरेशनकडे ई-मेल अथवा पोस्टाद्वारे पाठवावेत ही नम्र विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

विद्याधर अनास्कर
अध्यक्ष